# सातारा जिल्हा परिषद सातारा

## शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद सातारा.

दुरध्वनी - ०२१६२-२३४८०७ फॅक्स नं - ०२१६२-२३९४७२ ई - मेल - ssasatara1@rediffmail.com


**मान्यता / नुतनीकरण २०२२ ते २०२५ मान्यता आदेश**

**नमुना दोन**

जा.क्र :- शिक्षण/प्राथ/प्रशा-१३/आरटीई मान्यता/MAN- 6401 /२०२२.

दिनांक :- 19 / 7 / 2023

प्रती.

६७ **मुख्याध्यापक,मेरी माता इंग्लिश मेडियम स्कूल पिंगळी ता माण जि सातारा**
**युडायस क्रमांक :- 27310710906**

**विषय:- बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम,२००९ यांच्या कलम १८ च्या प्रयोजनार्थ,बालकांना मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क नियम,२०११ याच्या नियम११,पोट-नियम (४) अन्वये शाळांना मान्यता प्रमाणपत्र देण्याबाबत.**

शाळेच्या मुख्याध्यापकांनी **गटशिक्षणाधिकारी,पंचायत समिती, माण** कार्यालयाकडे सन २०२२ ते २०२५ पर्यंतच्या आरटीई मान्यतेच्या/नुतनीकरणासाठी सादर केलेल्या प्रस्तावानुसार गटशिक्षणाधिकारी यांनी शाळेची तपासणी करून सदर शाळा नियमानुसार आरटीई अॅक्ट - २००९ अन्वये भौतिक सुविधा पुर्ण करीत असलेने **गटशिक्षणाधिकारी,पंचायत समिती माण** यांचेकडील प्राप्त प्रस्तावानुसार आरटीई मान्यतेबाबतच्या शिफारशीसह स्वप्रतिज्ञापत्रास अधीन राहून

मी शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जि.प सातारा दिनांक **०१/०४/२०२२ पासून ते दिनांक ३१/०३/२०२५** पर्यंतच्या कालावधीसाठी **इयत्ता - १ ली ते इयत्ता- ८ वी माध्यम -इंग्रजी अनुदान प्रकार -स्वयंअर्थसहाय्यित शाळा -मेरी माता इंग्लिश मेडियम स्कूल पिंगळी ता माण जि सातारा** या शाळेस तात्पुरती आरटीई २००९ अंतर्गत मान्यतेस / नुतनीकरणास मान्यता देण्यात येत आहे.

**सदरची मान्यता ही खालील शर्तीच्या पूर्ततेच्या अधीन राहून देण्यात येत आहे :-**

१) मान्यतेचा कालावधी वाढवून मिळणार नाही आणि इयता आठवीनंतर मान्यता किंवा संलग्नता देण्यास कोणत्याही परिस्थितीत कोणतेही बंधन नसेल.
२) बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९(जोडपत्र एक) आणि महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम,२०११ (जोडपत्र दोन) मधील तरतुदीचे शाळा पालन करील.
३) शाळा विनाअनुदानित असल्यास नजीकच्या दुर्बल घटकातील आणि वंचित गटातील बालकांना,पहिल्या इयत्तेत, त्या इयत्तेतील विदयार्थी संख्येच्या किमान २५ टक्के मर्यादेपर्यंत प्रवेश देईल आणि प्राथमिक शिक्षण पुर्ण होईपर्यंत त्यांना मोफत व सक्तीचे शिक्षण देईल परंतु आणखी असे की,पूर्व प्राथमिक इयत्तांच्या बाबतीत देखील या प्रमाणकांचे अनुपालन करण्यात येईल.
४) विनाअनुदानित / स्वंयअर्थसहाय्यित शाळांसाठी परिच्छेद ३ मध्ये निर्दिष्ट केलेले बालकांकरीता शाळेला अधिनियमाचा कलम १२ (२) नुसार प्रतिपुर्ती मिळेल, अशी प्रतिपुर्ती मिळण्यासाठी शाळा स्वतंत्र बँक खाते देईल.

५) संस्था / शाळा कोणतीही कॅपिटेशन फी वसूल करणार नाही आणि कोणत्याही छाननी पध्दतींसाठी बालकांस किंवा त्याच्या/तिच्या मात्या-पित्यास किंवा पालकांस भाग पाडणार नाही.

६) कोणत्याही बालकास वयाच्या पुराव्याच्या अभावी धर्म,जात किंवा वंश,जन्मठिकाण किंवा यापैकी कोणत्याही कारणास्तव,शाळेमध्ये प्रवेश नाकारण्यात येणार नाही.

७) (एक) शाळेत प्रवेश दिलेल्या कोणत्याही बालकास तो ज्या इयत्तेत असेल त्याच इयत्तेत रोखून ठेवले जाणार नाही किंवा प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत शाळेतून काढून टाकण्यात येणार नाही.

(दोन) कोणत्याही बालकास शारिरीक शिक्षा किंवा मानसिक त्रास देण्यात येणार नाही.

(तीन) कोणत्याही बालकास प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत कोणत्याही मंडळाची परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक असणार नाही.

(चार) प्राथमिक शिक्षण पूर्ण केलेल्या प्रत्येक बालकांस नियम २३ अन्वये निर्धारित केलेले प्रमाणपत्र देण्यात येईल.

(पाच) विकलांग / विशेष गरजा असलेल्या विदयार्थ्यांच्या अधिनियमाच्या तरतुदीनुसार समावेश करण्यात येईल.

(सहा) अधिनियमाच्या कलम २३ (१) अन्वये निर्धारित केलेली किमान शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता धारण करणा-या शिक्षकांची नियुक्ती करण्यात येईल.

(सात) अधिनियमाच्या कलम २४ (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेली त्याची/तीची कर्तव्ये शिक्षक पार पाडतील आणि

(आठ) शिक्षकाने / शिक्षिकेने खाजगी शिकवणीच्या कामात स्वत:ला गुंतवून घेऊ नये,याची सुनिश्चिती शाळा करील.

८) शाळा समुचित प्राधिकरणाने निर्धारित केलेल्या अभ्यासक्रमाच्या आधारे तयार केलेल्या पाठयक्रमाचे पालन करील.

९) शाळा अधिनियमाच्या कलम १९ मध्ये विहीत केल्याप्रमाणे शाळेत उपलब्ध असलेल्या सुविधांच्या तुलनेत विदयार्थ्यांना प्रवेश देईल.

१०) शाळा अधिनियमाच्या कलम १९ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मानकांचे व प्रमाणकांचे पालन करील शाळा तपासणीच्या वेळी शाळेत उपलब्ध असलेल्या सुविधा आर.टी.ई च्या दहा निकषांची पूर्तता करीत असलेबाबत गटशिक्षणाधिकारी **पंचायत समिती माण** यांचेकडून स्वं -प्रतिज्ञापत्र दिलेले आहे.

११) मान्यता नसलेले वर्ग किंवा तुकडया, शाळेच्या नावाने शाळेच्या परीसरात किंवा इतरत्र चालवित येणार नाहीत.

१२) शाळेची इमारत किंवा इतर बांधकाम किंवा क्रीडांगण हे केवळ शिक्षणाच्या व कौशल्य विकासाच्या प्रयोजनार्थ वापरण्यात येतील.

१३) शाळा सोसायटी नोंदणी अधिनियम (१८६० चा २१) किंवा मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० अन्वये नोंदणी झालेल्या संस्थेमार्फत चालविण्यात येत आहे

१४)शाळा कोणत्याही व्यक्तीच्या, गटाच्या किंवा व्यक्तीसंघाच्या किंवा इतर कोणत्याही व्यक्तीच्या फायदयाकरीता किंवा कोणताही नफा मिळवण्यासाठी चालविण्यात येत नाही.

१५) शाळेचे लेखे सनदी लेखापालाकडून लेखापरिक्षित व प्रमाणित करून घ्यावेत आणि नियमांनुसार योग्य लेखा विवरणपत्रे तयार करावीत. प्रत्येक लेखा विवरणपत्राची एक प्रत जिल्हा शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांच्याकडे पाठविणेत यावी

१६) तुमच्या शाळेला मिळालेला **मान्यता सांकेतांक क्र-MAN0710906** असा आहे हा या कार्यालयास कोणताही पत्रव्यवहार करताना कृपया तो नमुद करावा याची नोंद घ्यावी.

१७)शिक्षण संचालक / जिल्हा शिक्षणाधिकारी वेळोवेळी मागणी करतील असे अहवाल व माहिती शाळेन सादर करावी किंवा शाळेच्या मान्यतेच्या शर्तीची निरंतर पुर्तता करण्यासाठी किंवा शाळेच्या कामकाजातील त्रुटी दुर करण्यासाठी शासन किंवा स्थानिक प्राधिकरण देईल अशा सुचनांचे पालन करावे.

१८) संस्थेच्या नोंदणी विषयक कोणत्याही प्रकारचे नुतनीकरण केल्याची सुनिश्चिती करावी.

टिप :- शाळेतील मुख्याध्यापकांनी सन 2022 ते 2025 पर्यंच्या आरटीई मान्यता / नुतनीकरणासाठी संबंधित गटशिक्षणाधिकारी / प्रशासनधिकारी कार्यालयाकडे सादर करण्यात आलेली ओसी (दुय्यम) नस्ती / फाईल पृष्ठ क्रमांकसह आपल्या कडेच व्यवस्थित जपून ठेवावी.भविष्यात माहिती अधिकारातील अर्ज कायदेशीर व नियमानुसार शाळेकडे वर्ग करण्यात येईल याची नोंद घ्यावी

**(शबनम मुजावर)**
**शिक्षणाधिकारी (प्राथमिक)**
**जिल्हा परिषद सातारा**